

परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 123 | गुरुवार दि. 28 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



## सामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवूनच केंद्र व राज्य सरकार विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवत आहे-ना. पंकजाताई मुंडे

### भाजपची कार्यपद्धती या विषयावर डॉ.प्रितमताई मुंडेंनी केले सविस्तर मार्गदर्शन



मुंबई दि. 27 ---गरीब व गरिबीची जाण असणारे पंतप्रधान आपल्या देशाला लाभले आहेत आणि याचमुळे केंद्र व राज्य सरकार सामान्य माणसाला समोर ठेवून आज विकासाच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे






लाभ पोहोचले पाहिजेत यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस सारखे कुशल नेते लाभले असल्यामुळे पक्षाला फार मोठे यश मिळाले आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत बीड जिल्हा भाजपच्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचा समारोप आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, समारोपाच्या शेवटच्या सत्रात "केंद्र आणि राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजना" या विषयावर पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.केंद्रात पान 3 वर

## ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल मुख्यमंत्र्यांची माहिती

### • केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा



नवी दिल्ली, दि. 27: साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत आज झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या पान 3 वर

## आज ठळक

### RBI च्या एका निर्णयाने आमदार, खासदारांना दिलासा!



भारतीय रिझर्व बँकेकडून सहकारी बँकेत सलग दहा वर्ष संचालक असणाऱ्यांना सलग संचालक होता येणार नाही. असा नवीन नियम लागू केला होता. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक दिग्गज मंत्री आमदार यांना कोल्हापूर जिल्हा बँकेवर सलग दहा वर्ष संचालक झाल्यानंतर पुन्हा पाच वर्ष संचालक होता येणार नव्हते. मात्र रिझर्व्ह बँकेने या नियमात काही बदल करून अशा संचालकांना दिलासा दिला आहे. राज्यासह देशभरातील सहकारी बँकेमधील संचालकांना सलग दहा वर्ष संचालक राहिल्यानंतर सलग तिसऱ्या टर्मला संचालक राहता येणार नाही. पण त्यानंतर तीन वर्षांनी पुन्हा संचालक होता येणार आहे. सहकारी बँकातील अपहाराचे प्रमाण पाहता भारतीय रिझर्व बँकेकडून सहकारी बँकेचे नियमात कडक बदल केले होते. सहकारी बँकेमध्ये कुलिंग कालावधी हा नवीन नियम अमलात आणून एखाद्या संचाकाला केवळ दहा वर्षे इतका कालावधी मर्यादित करण्यात आला होता. राज्यासह देशभरातील अनेक सहकारी बँकांमध्ये तब्बल वीस ते पंचवीस वर्ष संचालक पदावर राहून अनेक गैरव्यवहार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील देखील जिल्हा बँक यासारख्या सहकारी बँकेत देखील 20 ते 30 वर्ष संचालकांनी तळ ठोकला आहे. त्यामुळे सहकारी बँकेत वाढणाऱ्या गैरव्यवहारांना रोखण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेकडून दहा वर्ष संचालक पदाची मर्यादा करण्यात आली होती. त्याला राज्यातील काही सहकारी बँकेतील संचालकांनी आणि कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील संचालकांनी सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. पण रिजर्व्ह बँकेच्या बाजूने हा निकाल दिला होता. मात्र आता रिझर्व बँकेकडून या नियमात काही शितलता केली आहे. दहा वर्ष संचालक राहिल्यानंतर पुढील वर्षी त्या संचालकांना बँकेचे संचालक होता येणार नाही. मात्र त्यानंतरच्या तीन वर्षाच्या कुलिंग कालावधीनंतर बँकेचे संचालक होता येणार आहे. कुलिंग कालावधीत बँकेचे पान 3 वर

## न्याय मिळेपर्यंत आंबेडकर घराणे दळवी कुटुंबाच्या पाठीशी

### आनंदराज आंबेडकर यांचा शब्द; आर्थिक मदत, शासकीय नोकरी व घरकुलासाठी प्रशासनाला सूचना





बीड प्रतिनिधी :बीड शहरातील मातंग समाजातील युवक उमेश दळवी यांच्या झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी गंभीर दखल घेत दळवी कुटुंबीयांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांना धीर दिला. "या प्रकरणात पूर्ण न्याय मिळेपर्यंत आंबेडकर घराणे तुमच्या पाठीशी ठामपणे उभे राहील," असा विश्वास त्यांनी कुटुंबीयांना दिला.

रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सूर्यवंशी तसेच बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम गोटू वीर यांनी उमेश दळवी यांच्या पत्नी, आई, भाऊ व बहिणीची भेट घेऊन संपूर्ण घटनेची माहिती आनंदराज आंबेडकर यांना दिली. त्यानंतर आनंदराज आंबेडकर यांनी तात्काळ पोलीस प्रशासन, समाजकल्याण विभाग तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पान 3 वर

## राष्ट्रवादीला अर्थखातं परत देणार का? फडणवीस यांनी सोक्षमोक्ष लावला



तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात बरंच काही बदललं आहे. राष्ट्रवादी पक्षाची सर्व सूत्रं अजितदादा यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे आलेली आहेत. दुसरीकडे अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपदाचीही जबाबदारी आलेली आहे. सध्या पक्ष वाढवण्यासोबतच स्वतःचे नेतृत्त्व सिद्ध करण्याचीही जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्यावर आहे. अजितदादा उपमुख्यमंत्री असताना त्यांच्याकडे राज्याच्या अर्थखात्याचीही जबाबदारी होती. पान 3 वर

## ओंकार शुगर्सने फिरवली पाठ; ऊस बिल प्रश्नी शेतकऱ्यांची दिशाभूल



परळी / प्रतिनिधी परळी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक स्रोत असलेल्या ओंकार शुगर युनिट क्र 8 पांगरीने मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊसाची देयक घोषित दरानुसार अदा करावीत या मागणीला घेत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती लढा देत असून ओंकार कडून वारंवार आश्वासणाची बोळवण केली जात असल्याने समितीने या महिन्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार पूर्ण ऊस देयक शेतकऱ्यांच्या ख्याती वर्ग करण्यात यावी अशी मागणी पान 3 वर



जिल्ह्यात ऊस गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी 3050 रु सर्वात जास्त ओंकार शुगर्सने दर जाहीर करत पहिला हप्ता 2950 रु व दीपावली सणासाठी 100 रुपये प्रमाणे 2950 प्रमाणे सुरुवातीच्या काळातील काही शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा केली. नियमानुसार गाळपानंतर पंधरा दिवसात बिल देणे अपेक्षित असताना तीन-चार महिने विलंब केल्याने दि 9 मे रोजी शेतकऱ्यांनी सत्याग्रह आंदोलन पश्चात केवळ 1800 रुपये प्रति टनाप्रमाणे देयक अदा केले. गेले उर्वरित 1150 रुपये हे दि 25 मे पर्यंत संपूर्ण गाळप झालेल्या शेतकऱ्यांना 2950 प्रमाणे पैसे देण्याचं लेखी कबूल केलं. असे असताना सुद्धा अद्याप 1800 रुपये सुद्धा संपूर्ण शेतकऱ्यांना दिले गेले नाहीत.सर्व बाबतीत ओंकार शुगर कडून शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल केली जात आहे. नियमानुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर देयके अदा करावीत असे स्पस्ट आदेश असताना नियमाला हडताल पुसणाऱ्या राज्यातील 54 साखर कारखान्यावर साखर आयुक्तांनी सुनावणी घेत कारवाई केली असताना जिल्ह्यातील साखर कारखान्याबाबत राज्यसरकार साखर आयुक्त, जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मूक गिळून गप्प का असा प्रश्न शेतकऱ्यांना निर्माण झाला आहे.जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक मिळावीत अशी ठाम भूमिका संघर्ष समितीने घेतली आहे.

**ॲड. अजय बुरांडे संघर्ष समिती, बीड**

## केज तालुक्यात वादळ आणि अवकाळी पावसाचा पुन्हा फटका




केज प्रतिनिधी /रोहन गलांडे केज तालुक्यात सोमवारी रात्री आठ वाजता व मध्यरात्री झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे उतरेश्वर पिंप्री, कापरेवाडी,बोरगाव (बु.), नाव्होली,नांदूरघाट, राजेगाव,काळेगाव घाट परिसरात विजेचे खांब पडून व विजवाहक तारा तुटून पडल्या आहेत. नाव्होली ते केज राज्य रस्त्यावर सात ठिकाणी झाडे उन्मळून पडले आहेत.उतरेश्वर पिंप्री येथिल तुकाराम चंदनशिव यांच्या शेतातील शेततळ्यात पाणी असतांनाही शेत तळ्यातील मेनकापड उडून गेल्यामुळे शेत तळ्यातील पाणी कमी झाले आहे.त्यांच्या डाळिंबाच्या झाडाखाली सडा पडला आहे, शेतातील जनावरांचा गोठा ही आहे. बोरगाव येथील बाबुराव वळेकर यांच्या हौदाच्या परिसरा तील व नरसूबा शेतातील एकूण दहा विजेचे खांब पडून विजेच्या तारा तुटल्या आहेत.महा वितरण कंपनीने तात्काळ दुरुस्ती करून विज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## नरेंद्र मोदी पनौती आहेत", हर्षवर्धन सपकाळांची मोदींवर पुन्हा टीका




पंतप्रधान नरेंद्र मोदी पनौती आहेत", अशी टीका पुन्हा एकदा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोदींवर केली. सपकाळ यांनी दलिंदर या शब्दाचे स्पष्टीकरण देत पनौती शब्द वापरुन पुन्हा मोदींवर टीकास्त्र सोडले. महाविकास आघाडीच्या नेत्यांची विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक पार पडली. या बैठकीनंतर सपकाळ यांनी टिळक भवन, मुंबई येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पान 3 वर

## भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, गोयल, अग्रवाल यांची महत्त्वपूर्ण बैठक

### कृषी, बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र बळीराजाच्या उन्नतीसाठी एकत्र



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. उत्पादन वाढत असले तरी उत्पन्नाची हमी नाही, बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची मर्यादा आहे आणि शेतीकडे अजूनही अनेकदा केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच पाहिले जाते. मात्र आता या पारंपरिक चौकटी मोडून भारतीय शेतीला नव्या आर्थिक क्रांतीच्या केंद्रस्थानी आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक पान 3 वर

## वडवणी शहरासह तालुक्यात पाऊस व चक्रीवादळाचा कहर; अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, वीजपुरवठा खंडित

### ➡ उखाड्याने जनता त्रस्त; ओम घुगे यांच्या शेतातील सौर ऊर्जा ऊध्वस्त!




वडवणी | प्रतिनिधी वडवणी शहरासह तालुक्यात मंगळवारी सायंकाळी अचानक आलेल्या चक्रीवादळामुळे मोठे नुकसान झाले. जोरदार वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने नागरिकांची अक्षरशः तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडल्याने रस्ते काही काळ वाहतुकीसाठी बंद झाले होते. या काळामध्ये लाईट नसल्याने उखाड्याने जनता त्रस्त झाली होती. त्याचबरोबर चिंचवडगाव येथील व मोरे यांच्या शेतातील सोलार पंप वादळ वाऱ्यामुळे उध्वस्त झाल्याने मोठे नुकसान झाले आहे.

चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे शहरातील काही भागांमध्ये वीजवाहिन्या तुटून वीजपुरवठा खंडित झाला. अनेक घरांच्या पत्र्यांचे नुकसान झाले असून काही ठिकाणी दुकानांचे फलकही कोसळले. पान 3 वर

## अजितदादांच्या अपघाताला 4 महिने झाले तरी रोहित पवारांचा देवेंद्र फडणवीसांना सवाल




राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी एका विमान अपघातात आकस्मिक निधन झाले. बारामती येथे सभेसाठी जात असताना अजित पवारांच्या विमानाचं लँडिंग होण्यापूर्वीच स्फोट झाला. यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाल्याचे पाहायला मिळाले. अजित पवारांचे निधन होऊन 4 महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र अद्याप याप्रकरणी कोणतीही मोठी कारवाई झालेली नाही. आता याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली आहे. रोहित पवार यांनी नुकतंच त्यांच्या पान 3 वर

# देर आये, दुरुस्त आये!



काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती जमातीच्या एका बैठकीमध्ये नुकतेच एक वक्तव्य केले,ज्यामुळे त्यांनी स्वतःचाच पक्ष पिंजऱ्यात उभा राहिला. यापूर्वीसुद्धा खा. राहुल गांधी यांनी स्वतःच्याच पक्षातील चुकांबाबत अनेकदा वक्तव्य केले आहे. खरे तर गांधी परिवारातील आणि पक्षामध्ये वरिष्ठ नेते असलेले राहुल गांधी आपल्याच पक्षाबद्दल असे बोलतील असे अनेकांना वाटले नसेलही आणि इतर कोणत्याही पक्षात त्या पक्षातील पदाधिकारी किंवा वरिष्ठ नेता कधीही स्वतःच्या पक्षातील उणीव सांगत नाही .परंतु, पक्षात लोकशाही असलेला काँग्रेस पक्ष मात्र प्रत्येक नेत्यास पक्षांमध्ये बोलण्याची मुभा देतो पक्षाबद्दल किंवा इतर बाबतीत बोलण्यास मुभा देतो. मात्र, इतर पक्षात ही मुभा किती दिली जाते हा प्रश्न. असो ज्या त्या राजकीय पक्षाचा विषय.पण खुद्द राहुल गांधीच स्वतःच्या पक्षाच्या उणीवा जगजाहीरपणे वक्तव्य करून सांगतात. यावरून काँग्रेस आणि काँग्रेस नेते व कार्यकर्ते स्वपक्षाबाबतची चूक झाली असेल तर बोलू शकतात हे प्रथमतः राहुल गांधी यांच्या पक्षातील अनेकदा जाहीरपणे बोलण्यावरून लक्षात येते आणि त्यांच्या वक्तव्याची दखल किंवा गांभीर्याने घेतले तर काँग्रेस पक्षात चुका झाल्या आहेत असे आपणास लक्षात येईल. मात्र खुद्द पक्षातील त्या पक्षाचा माजी अध्यक्ष राहिलेला व्यक्ती जर बोलत असेल तर यापेक्षा लोकशाहीभिमुख असलेला पक्ष दुसरा असावा? याबाबतीत साक्षकता. खा.राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाचा ऐंशी नव्वदच्या दशकातला काँग्रेसचा चेहरा आरशात दाखवला आहे. खा. राहुल गांधी यांनी काँग्रेस बाबत घेतलेली भुमिका अगदी तंतोतंत खरी आहेच. कारण, काँगेस पक्षाच्या राजकीय जडणघडणीत कोणीच ज्या मुख्य प्रवाहात दलित -ओबीसी हवे होते ,तितकी संधी त्यांना देण्यात आली नाही.आजही काँग्रेस पक्षाच्या राजकीय जडणघडणीत किंवा राजकारणाच्या मुख्य प्रवाहात दलित ओबीसी बांधव नाहीतच जमा आहेत.पण खा. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली दलित ओबीसी काँग्रेस पक्षाच्या संघटनेत मुख्य प्रवाहात येतील आणि त्याची सुरुवात पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष हा बौद्ध आहे यावरून निश्चिती. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रवाहात दलितांना व ओबीसींना मोठ्या प्रमाणात सामावून घेतले जात आहे किंवा जाईलही. परंतु पक्षात हा विचार येणं हे राहुल गांधी यांच्या दूरदृष्टीमुळे. खरंच जर राजकारणात दलित ओबीसींना ऐंशी नव्वदच्या दशकात पक्षाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतले असते तर काँग्रेस आज जगातील सर्वात मोठा पक्ष ठरला असता. आज प्रादेशिक पक्ष उभे राहिले आहेत ते यामुळेच. कुठे दलितांनी तर कुठे ओबीसींनी एकत्रित येऊन अन्य पक्षाचा आसरा घेतला तर काहींनी नवीन प्रादेशिक पक्ष उभे केले आणि त्यात दलित ओबीसी स्वतः च नेतृत्व उभे करू लागले. हीच संधी काँग्रेस पक्षाने दिली असती तर काँग्रेसपासून निर्माण झालेले प्रादेशिक पक्ष आजघडीला दिसले नसते. यापूर्वी सुध्दा खा. राहुल गांधी यांनी प्रशासनात प्रमुख पदांवर किती दलित आहेत? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे जोपर्यंत दलित ओबीसींना काँग्रेस मुख्य संघटनेच्या प्रवाहात सामील करून घेणार नाही तोवर काँग्रेस पक्ष आणि धर्मनिरपेक्ष सत्ता सत्तेत येणार नाही असं म्हटलं तर थोडं धाडसाचं होईल. कारण, देशात प्रत्येक समाजाला आपसात भांडण लावून, फोडा आणि राज्य करा अशा नितीचा अवलंब केला जात आहे. याला पर्याय म्हणून दलित ओबीसी आणि इतर बांधवांना एकजूट करून धर्मनिरपेक्ष लोकांना एकत्र आणून लोकशाही आणि संविधान वाचावावे लागेल. त्यासाठी खा. राहुल गांधी यांचं वक्तव्य महत्वाचं आहे. खर तर काँग्रेसने केवळ ऐंशी नव्वदच्या दशकात नव्हे तर स्थापनेपासून काँग्रेस पक्षात मुख्य प्रवाहात दलित ओबीसींना सामावून घेतले नाही. काही प्रमाणात घेतले आहे यात दूमत नाही परंतू काँग्रेस संघटनेत मुख्य पदाधिकारी म्हणून किती दलित आहेत हा प्रश्न.

ऐंशी नव्वदच्या दशकाची काँग्रेस पक्षाची कारकीर्द पाहिली तर ऐंशीच्या दशकात म्हणजे 1978 ते 1983 काळात इंदिरा गांधी या काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या.तर त्यांचे चिरंजीव राजीव गांधी (28 डिसेंबर 1985 ते 21 मे 1991) पर्यंत काँग्रेसचे अध्यक्ष होते. 1984 मध्ये इंदिरा गांधींच्या निधनानंतर राजीव गांधींनी सूत्रे हाती घेतली आणि 1985 मध्ये ते पक्षाचे अधिकृत अध्यक्ष बनले.राजीव गांधी यांची हत्या 1991 मध्ये झाली.1991 मधील त्यांच्या हत्येनंतर, पी. व्ही . नरसिंह राव यांनी 1992 मध्ये अध्यक्षपदाची धुरा सांभाळली .पी. व्ही. नरसिंह राव यांनी 1992 ते 1996 पर्यंत काँग्रेसचे अध्यक्ष होते.त्यानंतर सीताराम केसरी हे 1996 ते 1998 पर्यंत अध्यक्ष पदांवर होते.तर सिताराम केसरी यांच्यानंतर सोनिया गांधी या 14 मार्च 1998 पासून काँग्रेस अध्यक्षपदी विराजमान झाल्या आणि त्यांनी प्रदीर्घ काळ हे पद सांभाळले. त्यामुळे खरं पाहिलं तर या सर्व अध्यक्षांच्या काळात काँग्रेस पक्षाने किती दलित ओबीसींना संधी दिली तर नाही किंवा कुठं नाही दिली असाही मदभेद करता येईल किंवा केला जातो.पण,मग खा.राहुल गांधी यांचे वाक्य योग्य नाही काय?असो मात्र, एक दलित अध्यक्ष झाल्यानंतर दलितांना आता सधी अपेक्षित आहे ती खा. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील आणि अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली उपलब्ध होईल हे राहुल गांधी यांच्या ताज्या वक्तव्यावरुन. काँग्रेस नेहमीच धर्मनिरपेक्ष विचार रुजवणारी आहे तसेच संविधानिक मुल्यांवर आधारित राजकीय पक्ष आहे.त्यासाठी राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा काढून धर्मनिरपेक्ष विचार पुन्हा रुजविण्याचा प्रयत्न केला.असो, मात्र, अनादिकाळापासून सत्तेत राहिलेल्या पक्षाने दलित ओबीसींना मुख्य प्रवाहात आणि महत्वाच्या पदांवर किती संधी दिली, विशेषकरुन दलितांना किती संधी दिली जी संविधानिक अपेक्षित होती?हे खा. राहुल गांधी अनेकदा दाखवून देतात.परंतू, काँग्रेस बदलली आहे आणि बदलत आहे एवढं मात्र नक्की.शेवटी काँग्रेस आणि खा.राहुल गांधी यांच्याकडून देर आये ,दुरुस्त आये! हेच सत्य.



**- पदमाकर उखळीकर ,**
**(लेखक मुक्त पत्रकार आहेत.)**
**मो.9975188912.**

# एफडीएसमोर तुकाराम मुंढेंची खरी परीक्षा

**डॉ. भारत कऱ्हाड**



महाराष्ट्रातील अन्न व औषध प्रशासन विभाग म्हणजेच फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन महाराष्ट्र हा केवळ परवाने देणारा किंवा कार्यालयीन कारभार करणारा विभाग नाही; तर तो थेट जनतेच्या आरोग्य सुरक्षेशी संबंधित असलेला अत्यंत संवेदनशील विभाग आहे. नागरिक रोज वापरत असलेले अन्नपदार्थ, औषधे, पाणी, मिठाई, तेल, मसाले, इंजेक्शन्स, हेल्थ सप्लिमेंट्स आणि सौंदर्यप्रसाधने सुरक्षित आहेत की नाहीत, यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी या विभागावर असते. त्यामुळेच या विभागाच्या आयुक्तपदी कठोर आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर राज्यभरात मोठी चर्चा सुरु झाली आहे.

मुंढे यांच्यासमोर केवळ कार्यालयीन शिस्तीचे आव्हान नाही, तर राज्यभर वाढत चाललेली बनावट औषधांची साखळी, अन्न भेसळ, ऑनलाइन औषधविक्री, भ्रामक जाहिराती, परवाना प्रक्रियेतील अनियमितता आणि मनुष्यबळाची कमतरता यांसारखी गंभीर आव्हाने उभी आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यात बनावट औषधांचा प्रश्न अत्यंत गंभीर बनत चालला आहे. अनेक वेळा नकली औषधे मूळ ब्रँडसारखीच दिसतात. सामान्य ग्राहकाला त्यातील फरक ओळखणे अवघड जाते. काही औषधांमध्ये आवश्यक औषधी घटक कमी प्रमाणात असतात किंवा नसतातच. त्यामुळे रुग्णाचा आजार बरा होत नाही, उलट त्याच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः ग्रामीण भागात डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधविक्री होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक मेडिकल दुकाने परवानाधारक फार्मासिस्टशिवाय चालवली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे.

ऑनलाइन औषधविक्री हे एफडीएसमोरील नव्या काळातील मोठे आव्हान बनले आहे. मोबाईल ॲप आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरुन कोणत्याही वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधे मागविण्याचे प्रमाण वाढत आहे. अँटिबायोटिक्सचा चुकीचा वापर, स्वतःच उपचार करण्याची वाढती प्रवृत्ती आणि नकली औषधांची ऑनलाइन विक्री यामुळे सार्वजनिक आरोग्यास




गंभीर धोका निर्माण होत आहे. त्यामुळे डिजिटल मॉनिटरिंग आणि तंत्रज्ञानाधारित नियंत्रण व्यवस्था अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

अन्न भेसळ ही दुसरी मोठी समस्या आहे. सणासुदीच्या काळात मिठाई, खवा, दूध, मसाले, तेल, तूप आणि इतर खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याची प्रकरणे समोर येतात. काही व्यापारी अधिक नफा मिळवण्यासाठी हानिकारक रसायनांचा वापर करतात. कृत्रिम दूध, सिंथेटिक पनीर आणि नकली ब्रँडेड खाद्यपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. रस्त्यावरील खाद्यपदार्थ, फास्ट फूड, क्लाउड किचन आणि ऑनलाइन फूड डिलिव्हरी व्यवस्थेची तपासणी हेही आता मोठे आव्हान बनले आहे.

एफडीएची जबाबदारी केवळ तपासणीपुरती मर्यादित नाही. औषध कंपन्यांचे उत्पादन नियम, जीएमपी मानके, खाद्यपदार्थांची गुणवत्ता, पॅकेजिंग, लेबलिंग आणि परवाना प्रक्रिया यांवर देखरेख ठेवण्याचे कामही या विभागाला करावे लागते. मात्र अनेक जिल्ह्यांत निरीक्षकांची पदे रिक्त आहेत. मनुष्यबळाची कमतरता, प्रलंबित फाईली आणि तपासण्यांचा कमी वेग यामुळे विभागाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याची चर्चा आहे.

भ्रामक जाहिराती हे आणखी एक गंभीर आव्हान आहे. “हे औषध सर्व रोग बरे करते”, “100% हमखास इलाज”, “एका दिवसात मधुमेह गायब”, “डॉक्टरांशिवाय उपचार” अशा जाहिराती सोशल मीडिया, यूट्यूब, स्थानिक चॅनेल आणि वर्तमानपत्रांत मोठ्या प्रमाणावर दिसतात. काही तथाकथित आयुर्वेदिक आणि हर्बल उत्पादनांच्या नावाखाली ग्राहकांची दिशाभूल केली जाते. लोकांच्या भीती, अज्ञान आणि आजारपणाचा गैरफायदा घेणाऱ्या या जाहिरातींवर कठोर कारवाई करणे अत्यावश्यक झाले आहे. ड्रग्ज अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट अंतर्गत अशा दाव्यांवर कारवाईची तरतूद असली तरी अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्याची गरज आहे.

एफडीए विभागातील पारदर्शकतेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. औषध दुकाने, खाद्य व्यवसाय आणि उत्पादन युनिट्सना परवाने देताना अनियमिततेच्या तक्रारी वेळोवेळी पुढे येत असतात. त्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि जबाबदार करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

तुकाराम मुंढे हे अचानक पाहण्या, शिस्तप्रिय कामकाज आणि कठोर निर्णयांसाठी ओळखले जातात. त्यामुळे विभागातील अधिकारी-कर्मचारी, औषध विक्रेते आणि खाद्य व्यवसायिकांमध्ये काही प्रमाणात धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने कठोर आणि निष्पक्ष प्रशासनाची गरज असल्याचे ग्राहक संघटना आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

एफडीए मजबूत असेल तरच लोकांचा अन्न आणि औषध व्यवस्थेवरील विश्वास टिकून राहू शकतो. कारण सार्वजनिक आरोग्य हा केवळ वैद्यकीय विषय नसून तो प्रशासन, पारदर्शकता, कायदा, विज्ञान आणि जनजागृती यांचा संयुक्त विषय आहे. त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्यासमोरील ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून महाराष्ट्राच्या आरोग्य सुरक्षेची मोठी परीक्षा आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# कुठे अवकाळीचा जहर: कुठे चक्रीवादळाचा कहर

माणसाच्या उपद्व्यापाला निसर्ग आता पूरता कंटाळला आहे. जगाच्या पाठीवर माणसाचे पाप भारी झाले. त्यामुळे निसर्ग आदमुसून गेला आणि तो आता खडबडून मोकळा श्वास घेऊ पाहातोय. माणसाने चालवलेले उपद्रव त्याला नकोसे वाटू लागले आहेत. म्हणून तो कड फेरत- कुस बदलत आहे, असे ग्रामीण बुजूर्ग लोक चावडीवर एकत्र बसून चर्चा करताना दिसत आहेत. नैसर्गिक आपदांवर भाष्य करणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर लेख अभ्यासा... संपादक.

चक्रीवादळ हे एक प्रकारचे विध्वंसक वादळ आहे. हे समुद्रात एका कमी दाबाच्या प्रदेशाभोवती गोलगोल फिरणाऱ्या हवेमुळे बनते. हिंदी महासागरात होणाऱ्या चक्रीवादळाला इंग्लिश भाषेत सायक्लॉन, अटलांटिकमध्ये होणाऱ्याला हरिकेन आणि पॅसिफिक महासागरातील चक्रीवादळाला टायफून या नावाने ओळखले जाते. सर्वसाधारणपणे चक्रीवादळाचा पुढे सरकण्याचा वेग ताशी 20 किलोमीटरपेक्षा बराच कमी असतो. चक्रीवादळाची तीव्रता या प्रकारांनी मोजण्यात येते- ▯ वातावरणशास्त्र- क्लायमॅटॉलॉजी, ▯ सामान्य सरासरीचे अवलोकन, ▯ उपग्रहाची मदत घेऊन, ▯ रडार वापरुन.

चक्रीवादळाचे नामकरण-

सध्या चक्रीवादळाला नाव देण्याची पद्धत आहे. हवामानतज्ज्ञ व त्याविषयी काम करणाऱ्या सर्वांना संवाद करण्यास सोपे जावे, म्हणून त्याचे नामकरण करतात. या पद्धतीचे जनक ऑस्ट्रेलियातील हवामानतज्ज्ञ आहेत. ▯ ते आपल्याला न आवडणाऱ्या राजकारणी लोकांचे नाव देत असत. ▯ अमेरिकन सैनिक आपल्या पत्नीचे किंवा मैत्रिणीचे नाव देत असत. ▯ 1979मध्ये जागतिक हवामान संघटनेने स्त्री पुरुषांची प्रचलित नावे देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यासाठी एक यादीच बनविली होती. ▯ सन 2000पासून एका वेगळ्या पद्धतीने नावे देण्यात येतात. निसर्गाशी संबंधीत, खाद्यपदार्थांची ती नावे आहेत. जेथे चक्रीवादळे येतात, त्या देशांची यादीही तयार करण्यात आलेली आहे. साधारणतः सहा वर्षांनी या यादीतील नावे वापरणे प्रथमपासून सुरु करतात.

माणसाच्या उपद्व्यापाला निसर्ग आता पूरता कंटाळला आहे. जगाच्या पाठीवर माणसाचे पाप भारी झाले. त्यामुळे निसर्ग आदमुसून गेला आणि तो आता खडबडून मोकळा श्वास घेऊ पाहातोय. माणसाने चालवलेले उपद्रव त्याला नकोसे वाटू लागले आहेत. म्हणून तो कड फेरत- कुस बदलत आहे, असे ग्रामीण बुजूर्ग लोक चावडीवर एकत्र बसून चर्चा करताना दिसत आहेत. कारण यंदा जगभरातच उष्णतेने उच्चांक गाठलेला असल्याच्या बातम्या पेपरात धडकत आहेत. मागील आठवड्यात मेक्सिको देशात उष्माघाताच्या तडाख्याने कहरच केला म्हणे. झाडावर बसलेली माकडे पाडाची आंबे पडावी तशी एकापाठोपाठ एक खाली मरुन पडली. बर्याच ठिकाणी माणसंसुद्धा उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे दगावल्याचे ऐकिवात आहे. गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यात तर रानटी श्वापदांचा धुडगूस-धुमाकूळ सुरुच आहे, तो कायम बंद होण्याचं नावच घेत नाही. वाघ, सिंह, अस्वल, कोल्हे मानवमात्राच्या रक्ताचे घोट घेऊन जीवितहानी करताहेत. तर महाकाय हत्तींचा कळप शेतशिवार आणि घरेदारे तुडवून धूळधाण करत ते मातीमोल करताहेत. राखणीविना शेतातील उभ्या पिकांची नासाडी झालेले दृश्य उघड्या डोळ्यांनी निमूटपणे बघावे लागते, त्यांना हाकलण्यास जावे तर ते माणसावर चवताळून येतात. माणसाला आदळून, आपटून आणि कुचलून ठार मारतात. हे शेतकऱ्यांचे किती म्हणावे दुर्दैव!

असह्य उष्णतेने बेजार माणूस पहाटेच्या मंद मंद गार हवेने साखरझोपेत असताना भूस्खलनाच्या एका नव्याच संकटात सापडतो. काही हाक ना बोंब करताच तो कायमचा झोपतो आणि सोयऱ्या- धायऱ्याविणाच त्याची मूठमाती होते. असेच एका देशातील टेकडीच्या पायथ्याच्या वसलेल्या खेड्यात घडले आहे. पहाटे लोक गाढ झोपलेले असतांना टेकडी गावावर कोसळली आणि शेकडो जण दबून मृत्यूमुखी पडली तर बाकी सारे जखमी होऊन उपचार घेत आहेत. तर गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, अमरावती आदी विदर्भातील जिल्ह्यांना चक्रीवादळाच्या तांडवाचा आणि अवकाळी पावसाचा चांगलाच फटका बसला आहे. घरदार, पीक यांची अतोनात हानी झाली आहे. जनजीवनात विस्कळीत झाले. निसर्गाच्या अनिश्चिततेसमोर मानवी सामर्थ्य कधीच टिकाव धरु शकत नाही. अशातच महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांवर चक्रीवादळाची सावली पसरली आहे. यामुळे नागरिकांच्या जीवनावर परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गेल्या आठवड्याभरापासून राज्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा कहर पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने अक्षरक्ष: झोडपून काढलं आहे. राज्यात एकीकडे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना विदर्भात सलग आठवडाभर पावसाची हजेरी लागताना दिसत आहे. पुढील तीन दिवसही विदर्भातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाकडून अवकाळी पाऊस, विजांच्या कडकडासह 30-40 किमी प्रति तास सोसाट्याच्या वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. जोरदार पावसामुळे केवळ शेतकरी समाजालाच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांना देखील मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. महाराष्ट्रात सुरु असलेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. पावसाची तीव्रता वाढत असून, पुढील काही दिवस राज्यावर मुसळधार पावसाची सावली पसरण्याची शक्यता आहे. म्हणूनच बर्याच लोकांच्या ओठांतून किंचाळी उमटत आहे, “अरंSSS... देवा! तुझ्या मनात हाय तरी कायरं? काय होईल कोण जाणे?”

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून “एल निनो” चक्रीवादळाची निर्मिती होत आहे. या चक्रीवादळामुळे देशभरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांच्या किनारपट्टी प्रदेशांत मोठ्या हवामान बदलाची शक्यता आहे. ताशी 70 किलोमीटर वेगाने हे वादळ किनारपट्टी प्रदेशांना धडकणार असल्याने, या भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाल्यास, येत्या दोन ते तीन दिवसांत या वादळाचा काही प्रमाणात परिणाम राज्यावर होण्याची शक्यता आहे. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात राज्यात 50 ते 60 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात, असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. दोन दिवसांपासून कोकणात मुसळधार पाऊस सुरु आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वादळासह झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मोठा फटका बसला असून, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. चक्रीवादळासह पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतकरी बांधवांवर मोठे संकट कोसळले आहे. पिकांच्या नुकसानीबरोबरच घरेदेखील उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पिके भुईसपाट झाली असून त्यांच्यासमोर उपासमारीची वेळ आली आहे. राज्यातील विविध ठिकाणी नदी-नाल्यांना पूर आला असून, अनेक गावे वाहून गेली आहेत. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. शासनाने बचाव कार्य हाती घेतले असून, विविध भागांतून नागरिकांची सुरक्षित सुटका करण्यात येत आहे. शासनाने सर्वतोपरी नागरीकांना मदत करावी, असे सुचवावेसे वाटते.

!! नागरिकानो, सावधान! स्वतःची काळजी स्वतः घ्या आणि दक्ष वागा !!

**- एक शेतकरीपुत्र -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

# डॉ.लक्ष्मीकांत यादव यांची तत्परता; तीन वर्षीय बालकाच्या नाकात अडकलेले बटन यशस्वीरित्या बाहेर काढले

## • दुर्बिणीच्या साहाय्याने शस्त्रक्रियेशिवाय उपचार; बालकाचा श्वास मोकळा, पालकांकडून डॉक्टरांचे आभार

माजलगाव | ( अनंत घडसिंगे ) :

माजलगाव येथील प्रसिद्ध कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ.लक्ष्मीकांत यादव यांनी वैद्यकीय कौशल्य आणि तत्परतेचे दर्शन घडवत तीन वर्षीय बालकाच्या नाकात खोलवर अडकलेले बटन यशस्वीरित्या बाहेर काढून त्याचा श्वासोच्छ्वास सुरळीत केला. वेळेत उपचार मिळाल्याने संभाव्य धोका टळला असून बालकाच्या पालकांनी व नातेवाईकांनी डॉ.यादव यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

माहितीनुसार, छत्रपती संभाजी महाराज चौक, बायपास रोड, माजलगाव येथे असलेल्या यादव हॉस्पिटलमध्ये सोमवार (दि. 25 मे) रोजी एका तीन वर्षीय बालकाला त्याचे आई-वडील उपचारासाठी घेऊन आले. बालकाला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने पालकांनी घडलेला प्रकार डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिला.






डॉ.यादव यांनी बालकाची तातडीने तपासणी केली. प्राथमिक तपासणीत नाकामध्ये काहीतरी अडकल्याचा संशय व्यक्त झाला. मात्र वस्तू नाकाच्या आत खोलवर अडकलेली असल्याने ती सामान्य तपासणीत स्पष्टपणे दिसून येत नव्हती. त्यानंतर डॉ.यादव यांनी अत्याधुनिक एंडोस्कोपी (दुर्बीण) तंत्रज्ञानाचा वापर करून नाकाची सखोल तपासणी केली.

तपासणीदरम्यान बालकाच्या नाकाच्या आतील भागात काळ्या रंगाची एक वस्तू खोलवर अडकलेली असल्याचे आढळून आले. ही वस्तू अत्यंत नाजूक जागी अडकली असल्याने ती काढताना विशेष दक्षता घेणे आवश्यक होते. कोणतीही शस्त्रक्रिया न करता, अत्यंत शांतपणे आणि कौशल्याने डॉ.यादव यांनी बालकाला प्रोसीजर रुममध्ये नेऊन दुर्बिणीच्या सहाय्याने ती वस्तू बाहेर काढली.

वस्तू बाहेर काढल्यानंतर ती कपड्यांमध्ये वापरले जाणारे फायबरचे बटन असल्याचे स्पष्ट झाले. बटन नाकात अडकल्यामुळे बालकाला श्वास घेण्यास अडथळा निर्माण होत होता. योग्य वेळी उपचार झाल्याने संभाव्य गंभीर गुंतागुंत टळली आणि बालकाचा श्वासोच्छ्वास पूर्ववत झाला.

उपचारानंतर बालकाची प्रकृती स्थिर असून त्याला कोणताही धोका नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. आपल्या मुलाला वेळेत उपचार मिळाल्याने मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त करत पालकांनी डॉ.लक्ष्मीकांत यादव व त्यांच्या वैद्यकीय पथकाचे आभार मानले.

### • पालकांसाठी महत्त्वाचा संदेश

लहान मुले खेळताना अनेकदा नाक, कान किंवा तोंडात लहान वस्तू टाकतात. अशा वेळी घरी स्वतः त्या वस्तू काढण्याचा प्रयत्न न करता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने वस्तू काढण्याचा प्रयत्न केल्यास ती अधिक आत जाऊन श्वसनमार्गात अडथळा निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो, असे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

या यशस्वी उपचारामुळे पुन्हा एकदा डॉ.लक्ष्मीकांत यादव यांच्या वैद्यकीय कौशल्याची आणि रुग्णसेवेतील तत्परतेची प्रचिती माजलगावकरांना आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि तरुणांच्या हिताच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित असल्याचे सांगत विविध कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा आपल्या भाषणात मांडला.पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, मी लहानपणापासूनच भाजपच्या संस्कारात वाढले. माझ्या नावातच भाजपचे कमळ आहे. लोकनेते मुंडे साहेबांमुळे अटलजी, आडवाणीजी सारख्या नेत्यांना जवळून अनुभवता आले. मुंडे साहेब मला सगळीकडे घेऊन जायचे, त्यांनी पक्षाला वाडी, वस्ती, तांड्यापर्यंत घेऊन जाण्यासाठी जे कष्ट घेतले त्यामुळे आज चांगले दिवस आपण पहात आहोत. मुंडे साहेबांनी जे स्वप्न पाहिले होते, त्या स्वप्नांना सरकारी योजनांच्या स्वरुपात मी आणले. हे काम माझ्या एकट्याचे नव्हते तर पक्ष आणि नेतृत्व माझ्या मागे उभे असल्याने हे शक्य झाले. जलयुक्त शिवार, मुख्यमंत्री ग्रामसडक, बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज अशा कितीतरी योजना चांगल्या रितीने राबवू शकले.

पंतप्रधान मोदी यांनी जातीधर्माच्या पलिकडे जाऊन सामान्य माणसाचा विचार केला.सामान्यांच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, पीएम किसान सन्मान योजना, मोफत अन्न धान्य अशा कितीतरी योजना सांगता येतील,ज्यात गरीबाचा विचार केला आहे. मोदीजी, देवेंद्रजी सारखे कुशल नेतृत्व लाभल्याने पक्षाला आज फार मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या संस्कारातून पक्षाला भविष्यात आणखी मजबूत करण्याचा संकल्प आपण सर्वजण करुया असे आवाहन याप्रसंगी केले.

आजच्या सत्रात "कार्यपद्धती" या विषयावर माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्ता आधारित आणि विचारधारेवर चालणारा तत्वनिष्ठ पक्ष आहे. आपला पक्ष एका विशिष्ट 'कार्यपद्धतीने' वाटचाल करतो आहे. संघटन,संपर्क, जनभावना आणि पक्षशिस्तीस अनुरुप आपली कार्यपद्धती असून याचा अवलंब सर्वांनी करावा असे आवाहन त्यांनी केले.प्रशिक्षण वर्गास दोन्ही दिवशी ना. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे पूर्णवेळ उपस्थित होत्या, त्यामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह होता. शिबीरात सर्वाची चहा, नाश्ता, निवास, भोजनाची व्यवस्था योग्य झाली की नाही, याची त्यांनी स्वतः आस्थेवाईकपणे प्रत्येकाला बोलून चौकशी केली. त्यांच्यासमवेतच नाश्ता, भोजन केले. सत्राचा समारोप झाल्यानंतर सर्व सुखरुप पोहोचा, सावकाश जा असा काळजीचा सल्लाही दिला. आ. नमिता मुंदडा, माजी आमदार बदामराव पंडित, प्रवक्ते नवनाथ बन, राम कुलकर्णी, बाळदादा पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवनाथ शिराळे, माधव निर्मळ, संतोष हंगे, विजय गोल्हार यांसह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

-----------------------------------

विविध अडचणींसंदर्भात श्री. शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सकारात्मक चर्चा झाली. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ राहुल आहेर, विनय कोरे, राहुल कुल, अभिमन्यु पवार, विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे , साखर आयुक्त संजय कोलते आधी या बैठकीस उपस्थित होते.या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेतील मुद्द्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करुन मुख्यमंत्री म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे श्री. शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य सरकारसोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्चेल प्राइजिंग' ( किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य सरकारकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरु केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. 2 लाख टनांऐवजी 10 लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून 15 रुपये 80 पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले. नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करुन मुख्यमंत्री म्हणाले,आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले.यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली .

-----------------------------------

दळवी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांच्या पत्नीला शासकीय नोकरी, तातडीची आर्थिक मदत तसेच घरकुल योजना मंजूर करण्यासाठी संबंधित विभागांनी त्वरित कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी समाजकल्याण अधिकाऱ्यांना दिल्या. समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणारी आर्थिक मदत तात्काळ वितरित करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.याचबरोबर पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत या प्रकरणातील इतर संशयित आरोपींनाही ताब्यात घेण्यात यावे, पुरवणी एफआयआरमध्ये संबंधितांची नावे समाविष्ट करावीत तसेच ॲट्रॉसिटी कायद्यान्वये अधिक कठोर कलमे लावून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, प्रदेशाध्यक्ष सूर्यवंशी तसेच पदाधिकारी बीडमध्ये तळ ठोकून असून, न्याय मिळेपर्यंत आंदोलनात्मक भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

-----------------------------------

परंतु अजितदादांकडे असलेले उपमुख्यमंत्रिपद सुनेत्रा पवार यांना मिळालेले असले तरीही त्यांच्याकडे अद्याप अर्थखाते देण्यात आलेले नाही. याबात सुनेत्रा पवार यांन नुकते नाराज व्यक्त केल्याचे बोलले जात आहे. यावरच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, महत्त्वाचे मंत्री, शासकीय अधिकारी यांचे शिष्टमंडळ आज दिल्ली दौऱ्यावर होते. या दौऱ्यात शिष्टमंडळाने केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शाहा यांची भेट घेतली. या भेटीत कांद्याच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली असून अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. हीच बैठक संपल्यानंतर फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी चर्चा केली. यावेळी बोलताना पत्रकारांनी त्यांना सुनेत्रा पवार यांनी अर्थ खात्याबाबत व्यक्त केलेल्या नाराजीवर विचारण्यात आलं. यावर बोलताना अद्याप तरी माझ्यापर्यंत त्यांची अशी कोणतीही नाराजी आलेली नाही. त्या याबाबत जेव्हा माझ्याशी काही बोलतील, तेव्हाच मी यावर माझे मत व्यक्त करेन, असे फडणवीस यांनी सांगितले. राष्ट्रवादीच्या नेत्यांची 26 मे रोजी मुंबईत एक बैठक पार पडली. या बैठकीला अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. याच बैठकीत अर्थखात्यावरही चर्चा झाल्याचं बोललं जातंय. अजितदादा असताना अर्थखातं राष्ट्रवादीकड होते. आता हे खाते परत राष्ट्रवादीला मिळालेले नाही, असे म्हणत सुनेत्रा पवार यांनी खंत व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. त्यानंर आता या कथित नाराजीनंतर राजकारणात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. फडणवीस यांनीही अद्याप कोणतीही नाराजी माझ्याकडे आलेली नाही, असे सांगितल्याने भविष्यात काय होणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

-----------------------------------

निवेदनात द्वारे केली. ऊस देयक अदा न झाल्यास दि 1 जून पासून साखर कारखान्यासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला.ओंकार शुगर्स कडून मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊस देयक प्रश्नी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती वेळोवेळी निवेदने, आंदोलने करत आलेली असून दि 8 मे रोजी केलेल्या बेमुदत सत्याग्रह आंदोलन प्रसंगी कारखाना प्रशासनाने दि 25 मे पर्यन्त घोषित केलेल्या 2950 रु प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन देत 1800 रु वर्ग देखील केली.एकाच गळीत हंगामात सुरुवातीला 2950 दर पश्चात 1800 रुपये देयक दिली. मात्र मे महिना संपत आला तरी कारखाना प्रशासनाकडून घोषित केलेल्या गाळप केलेल्या ऊसाबाबत शेतकऱ्यांना घोषित दरानुसार देयक अदा करण्याबाबत चालढकल होत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवार दि 27 रोजी कारखान्यासमोर घोषणाबाजी करत आपल्या मागण्याचे निवेदन कारखाना प्रशासनाला देत या महिण्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक अदा न केल्यास दि 1 जून पासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसोबत संघर्ष समितीचे ॲड. अजय बुरांडे, ॲड.श्रीनिवास मुंडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके कॉ.भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख हनुमंत लोंढे, कृष्णा कराड , धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उपस्थित होते.

-----------------------------------

सपकाळ यांनी आषाढी कार्तिकेच्या वेळेत होणाऱ्या एसआयआर प्रक्रियेवरही सवाल उपस्थित केला. एसआयआरसाठी निश्चित करण्यात आलेल्या आषाढी वारीच्या कालखंडावरुन हर्षवर्धन सपकाळ यांनी निवडणूक आयोग आणि भाजपावर टीका केली. "या कालखंडात (एसआयआर) महाराष्ट्रात मोठा उत्सव असतो, वारकऱ्यांना मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी, भक्तांना वगळण्यासाठी भाजपाने आयोगाशी संगनमताने हा घाट घातला आहे", असा आरोप सपकाळ यांनी केला. तसेच, हा घाट यशस्वी होऊ देणार नाही, असेही सपकाळ म्हणाले. कांदाप्रश्नावरुन काल (मंगळवारी) तीन तास रस्ता जाम केल्याचे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले. "या आंदोलनात राष्ट्रवादी (शरद पवार) चे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, रोहित पवार, अंबादास दानवेही होते. या आंदोलनानंतर राज्य सरकारच्या अर्ध्या मंत्रिमंडळाला दिल्लीला जावे लागत आहे. ही विरोधी पक्ष, शेतकरी आणि जनतेची ताकद असल्याचे सपकाळ म्हणाले. कालच्या चमत्कारामुळेच त्यांना दिल्लीत नमस्कार घालावा लागत आहे, पण, दिल्लीतून हात रिकामा घेऊन माघारी घेऊ नका", असा सज्जड दम सपकाळ यांनी दिला. मी कोणताही चुकीचा शब्द वापरलेला नाही. दलिंदर हा लक्षण दर्शवणारा शब्द आहे. दारिद्र्य हा संस्कृत शब्द बोली भाषेत दलिंदर होतो. मोदी सत्तेत आल्यापासून शेतकऱ्यांना भाव नाही, बेरोजगारी वाढली आहे. महिलांवरील अत्याचार वाढले आहेत, भ्रष्टाचार बोकाळला आहे त्या अर्थाने त्या शब्दाचा वापर केला", असे स्पष्टीकरण सपकाळ यांनी दिले. तसेच, "संस्कृतमधील शब्द भाजपाला खटकला असेल तर, नरेंद्र मोदी हे पनौती आहेत, असा पुनरुच्चार मी करतो", अशी टीका सपकाळांनी केली.

-----------------------------------

अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, भारतीय स्टेट बँकेचे (SBI) कृषी विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक गोविंद नारायण गोयल आणि मोतीलाल ओसवाल समूहाचे अध्यक्ष रामदेव अग्रवाल यांच्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीचा केंद्रबिंदू होता "भारतीय शेतकऱ्याला राष्ट्रउभारणीच्या केंद्रस्थानी आणणे".गांधी, गोयल, अग्रवाल यांच्यात झालेली ही बैठक केवळ औपचारिक चर्चा नव्हती, तर भारताच्या ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची सुरुवात मानली जात आहे. या बैठकीनंतर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले की, तळागाळातील प्रत्यक्ष सामाजिक कार्य, संस्थात्मक बँकिंगची ताकद आणि देशातील वित्तीय बाजारपेठेचा अनुभव यांची सांगड घालत भारतीय शेतीला नव्या युगात नेण्याचा निर्धार या बैठकीतून व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामागे "शेती म्हणजे फक्त उत्पादन नव्हे, तर राष्ट्र निर्मितीचे शक्तिशाली माध्यम" ही भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली. आधुनिक वित्तीय नियोजन, बाजारपेठेतील गुंतवणूक, शाश्वत शेती पद्धती, मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक पटींनी वाढविण्याचा रोडमॅप तयार करण्यावर भर देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची. कारण खऱ्या अर्थाने विकसित भारताचा मार्ग हा गावातून आणि शेतातूनच जातो. देशातील लाखो शेतकरी आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, तर भारताचे आर्थिक सार्वभौमत्व अधिक बळकट होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. देश बदलण्याची मोठी स्वप्ने अनेकांनी पाहिली; परंतु ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जल, जमीन, जन आणि अर्थव्यवस्था यांना एकाच ध्येयाने जोडण्याची आवश्यकता असते. हीच दिशा या महत्त्वपूर्ण बैठकीतून स्पष्टपणे पुढे आल्याचे बोलले जात आहे.

-----------------------------------

वडवणी तहसीलच्या समोरील झाडे उन-मळून पडल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला होता. शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके आडवी झाल्याने मोठ्या आर्थिक नुकसानीची भीती व्यक्त केली जात आहे.वडवणी, तेलगाव, चिखलबीड, रुई पिंपळा, चिंचवडगाव, साळींबा, कवडगाव, पुसरा, कानापूर, लक्ष्मीपूर, मामला, मोरवड, बाहेगव्हाण,कुप्पा, खळवट लिमगाव, देवडी सह आदी भागांत वादळाचा सर्वाधिक फटका बसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान, प्रशासन आणि महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून नुकसानग्रस्त भागांची पाहणी सुरु असून पडलेली झाडे हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु करण्यात आले आहे. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

-----------------------------------

ट्वीटरवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये रोहित पवारांनी अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावरुन थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. अजितदादांच्या अपघाताला उद्या 4 महिने होतील, पण मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात दिलेला शब्द अजूनही पाळलेला नाही, असा थेट आरोप रोहित पवारांनी केला आहे. तसेच रोह पवारांनी सीआयडीच्या (CID) संथ कारभारावर तीव्र संताप व्यक्त करत उद्या सीआयडी कार्यालयावर धडक देणार असल्याचा इशाराही दिला आहे.आदरणीय मुख्यमंत्री साहेब... अजितदादांच्या अपघाताला उद्या 4 महिने होतील. अधिवेशनात बोलताना तुम्ही गुन्हेगारांना पाताळातून शोधून काढण्याचा, CBI चौकशीबाबत अमित शहा साहेबांकडे पाठपुरावा करण्याचा तसंच कर्नाटकात नोंद झालेली झिरो FIR महाराष्ट्रात वर्ग करुन घेण्याचा शब्द दिला होता. आपण शब्द देऊन अडीच महिने होत आले, या अडीच महिन्यात काय कार्यवाही झाली हे आपणच सांगावे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा साहेबांसोबत गेल्या अडीच महिन्यात आपल्या असंख्य बैठका झाल्या असतील त्यामध्ये सीबीआय चौकशीचा मुद्दा आपण घेतला नसेल तर आज होणाऱ्या बैठकीत तरी हा मुद्दा आग्रहाने घ्यायला हवा. राष्ट्रवादीचे मंत्री उपस्थित असतील तर त्यांनी देखील पाठपुरावा करायला हवा. मित्र हयात असला किंवा नसला तरी मित्रासाठी मैत्री नेहमीच जिवंत असते, ही सर्वसामान्य जनतेची भावना असते, राजकीय लोकांसाठी ही भावना वेगळी आहे का ? असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.राहिला प्रश्न CID चौकशीचा तर CID काय करते नेमकं हेच कळत नाही. गेल्या 28 तारखेला CID कार्यालयात गेलो असता तपास अधिकारीच उपस्थित नव्हते, त्यांना mail करुन अनेक नवे पुरावे दिले, पत्र स्वतः जाऊन दिले तरी त्यांचा काहीही प्रतिसाद नाही. अजितदादांच्या अपघात प्रकरणात सीआयडी करत असलेला तपास बघता, CID सारख्या कुचकामी यंत्रणा म्हणजे बिनकामाचे ओझेच म्हणावे लागेल. असो, उद्या सीआयडी ऑफिसची वेळ मागितली असून उद्या सकाळी 10.30 वाजता भेट देणार आहे. CID ऑफिसला कदाचित सनदशीर मार्गाची भाषा समजत नसेल तर वेगळ्या भाषेत सांगावे लागेल, असे रोहित पवार म्हणाले.

-----------------------------------

कोणतेही पद धारण करता येणार नाही. केवळ सभासद म्हणून व्यवहार करण्याची मुभा भारतीय रिझर्व बँकेने दिली आहे.

## पान 4 वरुन

शेतकरी आणि व्यापाऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ सुविधा मिळणे गरजेचे आहे. शहरात कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या भाजी मंडई इमारती धूळ खात पडून राहणे योग्य नाही. प्रशासनाने तातडीने या इमारती वापरात आणाव्यात. नागरिक आणि विक्रेत्यांनीही सहकार्य केल्यास बीड शहरासाठी आदर्श भाजी मंडई उभी राहू शकते," असे मत आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले.या पाहणी वेळी नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी शैलेश फडसे, नगरसेवक, व्यापारी प्रतिनिधी तसेच पालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

-----------------------------------

भेट देतात. यंदाचा अधिक मास 17 मे ते 15 जून या कालावधीत सुरु असून संपूर्ण महिनाभर येथे धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा, भजन-कीर्तन आणि गोदावरी स्नानासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे.

स्थानिक पातळीवर सुरु असलेल्या आठ ते दहा होटग्यांमधून क्षमतेपेक्षा अधिक भाविकांना बसवून नदी पार केली जात आहे. या होटग्यांना कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे सांगितले जात असून अनेक होटग्यांमध्ये लाईफ जॅकेट, दोरखंड, बचाव साधने किंवा प्रशिक्षित चालक यांचाही अभाव आहे. विशेष म्हणजे नदीच्या मध्यभागी असलेल्या चक्रतीर्थ परिसरात पाण्याचा प्रवाह खोल आणि धोकादायक मानला जातो.गोदावरी नदी परिसरात अपेक्षित पोलीस बंदोबस्त नसल्याचेही स्पष्टपणे दिसून येत आहे. यात्रेसाठी लाखो भाविक येत असताना नदीकाठावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ तैनात नसल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. विशेष म्हणजे यात्रेतील दुकाने, वाहनतळ आणि नदीकाठ परिसरातून महसूल वसूल केला जात असतानाही मूलभूत सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थ आणि भाविकांकडून केला जात आहे.पुरुषोत्तमपुरी ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर मागील वर्षभरापासून ग्रामपंचायत प्रशासनाच्या ताब्यात आहे. मात्र एवढ्या मोठ्या धार्मिक यात्रेत ग्रामपंचायत कार्यालयाचा एकही कर्मचारी नदी परिसरात उपस्थित नसल्याचे चित्र अनेकांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.सध्या अधिक मास यात्रेमुळे दररोज लाखो भाविक पुरुषोत्तमपुरी येथे दाखल होत आहेत. अशा परिस्थितीत नदीतील वाहतुकीवर नियंत्रण नसल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विशेषतः महिला आणि वृद्ध भाविकांची संख्या अधिक असल्याने धोका अधिक वाढला आहे.भाविकांच्या म्हणण्यानुसार, एका होटग्यात किमान वीस ते पंचवीस लोकांना बसवले जाते. काहीवेळा महिलांना उभ्यानेच प्रवास करावा लागतो. जर नदीच्या मध्यभागी एखादा अपघात झाला तर जीव वाचविण्याची कोणतीही व्यवस्था नाही. भाविक आणि ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पुढील उपाययोजना तातडीने करण्याची मागणी केली आहे.सर्व होटग्यांची तात्काळ तपासणी करून परवानाधारक होटग्यांनाच परवानगी द्यावी प्रत्येक होटग्यात लाईफ जॅकेट सक्तीचे करावे क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक थांबवावी नदी परिसरात एनडीआरएफ किंवा आपत्ती व्यवस्थापन पथक तैनात करावे पोलीस बंदोबस्त वाढवून नियंत्रण कक्ष सुरु करावा ग्रामपंचायत आणि महसूल प्रशासनाने संयुक्त देखरेख ठेवावी चक्रतीर्थ परिसरात सूचना फलक आणि सुरक्षा दोर उभारावेत दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी आधीच उपाययोजना करणे गरजेचे आहे, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली.

-----------------------------------

रुग्णालयात उपचार घेत आहेत.पोलिसांनी चाकूने वार करणाऱ्या अमोल गावडेला तात्काळ बेड्या ठोकून आपल्या तत्परतेची झलक दाखवली असली, तरी मूळ वाद उकरून काढणारा आणि "तू माझ्या बहिणीचा नाद सोडून दे, तुझे लग्न आम्ही तिचे सोबत होऊ देणार नाहीत" अशी धमकी देणारा मुख्य सूत्रधार सुमित कदम अद्याप मोकाटच आहे. "हल्ल्याचे मुख्य कारण सुमित कदम असताना, तो अजूनही पोलिसांच्या हाती कसा लागला नाही? त्याला कोण पाठीशी घालत आहे?" असा संतप्त सवाल जखमीच्या नातेवाईकांकडून विचारला जात आहे. हल्ल्याच्या वेळी आरोपींनी भररस्त्यात "जर आमच्यावर केस केलीस, तर तुझ्यावर आम्ही ॲट्रॉसिटीची केस करू!" अशी उघडीनागडी धमकी दिली होती. कायद्याचा गैरवापर करून पोलिसांना आणि फिर्यादीला घाबरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सर्व आरोपींना तात्काळ गजाआड करणे गरजेचे आहे. पोलीस निरीक्षक सूर्यतळ यांनी एका आरोपीला पकडून कारवाईची सुरुवात केली असली, तरी उर्वरित आरोपींना पकडल्याशिवाय बायपास परिसरातील गुंडांचा माज उतरणार नाही, अशी भावना नागरिकांमध्ये आहे.बायपास रोडवरील या थरारनाट्यामुळे शहरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस प्रशासनाने केवळ एका आरोपीच्या अटकेवर समाधान न मानता, सुमित कदम आणि त्या दोन अनोळखी रॉडबहाद्दरांचा शोध घेण्यासाठी तात्काळ पथके रवाना करावीत. उर्वरित सर्व आरोपींना 24 तासांच्या आत अटक करून त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी दिला आहे.

-----------------------------------

मुरलीधर कुंडकर, उत्तम काकडे सर, संजय गाडे, चंद्रकांत आव्हाड, रामभाऊ मतकर, रघुनाथ बोले, अनिल बोले, अनंत बोले, विनोद बोले,केरबा कोरे आणि गोपीनाथ काकडे यांची निवड करण्यात आली.

समिती सदस्य म्हणून , बालाजी गवते, बालाजी बोले, सोमनाथ गवते, लक्ष्मण गवते, दिगांबर गवते, नानासाहेब कुंडकर, बालाजी काळे, अरुण साखरे,आप्पासाहेब काळे, पिंटू बोले, राहुल बोले, तानाजी काळे, महेश साखरे, अमर बोले, सतीश गाडे, दत्ता कुंडकर, गणेश जावडे, दिनेश जावडे, अक्षय सरवदे, रोहित बोले, प्रदीप बोले, दीपक बोले, करण बोले, प्रल्हाद होळकर, संतोष बोले, मोहन काळे, सर्जेराव कुंडकर, भागवत गवते, अरुण साखरे, दत्ता गवते, दत्ता बोले, शुभम येडुतकर, राजकिरण काकडे, रोहन रोडगे, विवेक बोले, विजय कुंडकर, रोहन गवते, सचिन मतकर, गौरव बोले, ओंकार बोले, अमित बोले, अमोल बोले आणि वाल्मिक पितळे यांची निवड करण्यात आली आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक ऐक्य, संस्कृती संवर्धन आणि समाजप्रबोधनाचे विविध कार्यक्रम जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारिणीच्या वतीने देण्यात आली. जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

-----------------------------------

यांनी उपस्थित केला आहे.

-----------------------------------

तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी उन्हाळ्याच्या सुट्ट्या घालवण्यासाठी केज तालुक्यातील एका खेडेगावात आपल्या मामाच्या घरी आली होती. घटनेच्या दिवशी ती घरात एकटीच झोपलेली असताना, तिचा चुलत मामेभाऊ तिथे आला. त्याने "आजी कुठे आहे?" अशी विचारणा केली. निष्पाप मुलीने "आजी शेतात सरपण (लाकडे) आणण्यासाठी गेली आहे," असे सांगताच आरोपीच्या मनातील वासना सुटली. त्याने तात्काळ मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मुलीने प्रसंगावधान राखून विरोध केला आणि आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, नराधमाने तिचे तोंड एका हातरुमालाने घट्ट बांधले आणि घराची कडी आतून लावून घेतली. पीडिता जेव्हा कशीबशी सुटून दरवाजाची कडी उघडण्यासाठी धावली, तेव्हा आरोपीने तिला जमिनीवर पाडले आणि तिचे दोन्ही हात दोरीने बांधून तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. "या प्रकाराबाबत कोणाला काही सांगितलेस, तर तुला जीवे मारून टाकीन," अशी धमकी देऊन आरोपी तिथून पसार झाला. या भीषण प्रसंगानंतर पीडित मुलीने अत्यंत धैर्याने आपल्या कुटुंबाला घडलेला सर्व प्रकार सांगितला. कुटुंबाने तात्काळ केज पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. पीडितेच्या तक्रारीवरुन केज पोलिसांनी नराधम मामेभावाविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) आणि इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला.

-----------------------------------

साचल्याने शेतकऱ्यांना बाजारात येणे कठीण झाले आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या दुकानांसमोरही पाणी साचल्याने त्यांच्या व्यवसायावर याचा थेट परिणाम झाला आहे. रस्त्याच्या बाजूला असलेल्या बांधकाम साहित्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास आणखी अडथळा निर्माण होत असल्याचे चित्रात स्पष्ट दिसत आहे.पावसाळा तोंडावर असताना शहरात नाल्या पुर्ण होऊन नालेसफाई होणे अपेक्षित होते.मात्र, या मुख्य रस्त्यावरील नाले सफाई झालीच नसल्याचे या दृश्यावरुन सिद्ध होते. यावरुन आता केज नगर पंचायत आणि रस्ता रुंदीकरण व देखभालीचे काम करणारी 'मेगा कंपनी' यांच्यात संशयाचे वातावरण आहे.

नगर पंचायतने पावसाळ्यापूर्वी नाले सफाईची मोहीम कागदावरच राबवली काय? की कंपनीचे दुर्लक्ष? मेगा कंपनीने रस्त्याचे काम करताना पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य भुयारी गटारांची व्यवस्था केली नाही का?या प्रकरणी एकमेकांकडे बोट दाखवण्याच्या या कारभारामुळे सामान्य जनता मात्र वेठीस धरली जात आहे.त्यामुळेनागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.पहिल्याच पावसात जर ही अवस्था असेल,तर ऐन पावसाळ्यात या रस्त्यावरुन चालणेही अशक्य होईल. प्रशासनाने तात्काळ या पाण्याचा निचरा करावा आणि नाल्या साफ कराव्यात,अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी दिला आहे.आता या प्रकरणी केज नगर पंचायत प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार कंपनी खडबडून जागी होऊन तात्काळ उपाययोजना करणार का,याकडे केजवासीयांचे लक्ष लागले आहे.

-----------------------------------

त्यांच्यावर मंगळवार दि. 26 रोजी सायंकाळी 4 वाजता माजलगांव येथील मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्या माजलगांव येथील महाराष्ट्र पोलिस न्यूजचे प्रतिनिधी दत्ताराज आळणे यांच्या मातोश्री होत. तसेच शिवसेनेचे माजी नगरसेवक अशोक आळणे यांच्या त्या चुलती होत.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यसंस्कारावेळी राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, विधी क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------

प्रशासनाने कारवाई केलेली दिसून येत नाही. तसेच भेसळ करणाऱ्या कोणत्याही व्यावसायिकावर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केल्याची साधी नोंद नाही, या व अशा संतप्त प्रतिक्रिया असून बीडच्या अन्न व औषध प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. एकूणच तुकाराम मुंडे साहेबांनी सर्वप्रथम त्यांच्या केज येथील अन्न व औषध अधिका-यांवर कठोर कारवाई करणे अपेक्षित असल्याच्या भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे चर्चा सत्र सुरु झाले आहे.

-----------------------------------

मागणी कासारी ( बो ) येथिल सर्व गावकरी वनविभागाला विनंती करतात

-----------------------------------

असून, संबंधित सर्व आरोपींना तात्काळ अटक करुन कसून चौकशी करण्यात यावी. तसेच मुख्यमंत्री यांच्या भूमिकेबद्दल संशय असून सदरील प्रकरणात मुख्यमंत्री बोलत नाहीत त्यांनी गृहविभागाला योग्य कार्यवाही करणायची सूचना करावी असे आवाहन सदरील पत्रकात तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केले आहे. तसेच

सदर खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी सक्षम पुरावे सादर करण्यात यावेत. तसेच पीडित कुटुंबाला शासनामार्फत 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन त्यांच्या पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा पीडित कुटुंबास न्याय न मिळाल्यास राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, अश्या आशयाच निवेदन तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे, सोशियलमीडिया समन्वयक सुधाकर कांबळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले.

-----------------------------------

करण्यात आले. यावेळी ऊसतोड कामगार संघटनेचे जिल्हा सचिव तुळशीराम भाऊ आवाड, नामदेव आवाड, शिवाजी आवाड, धुराजी आवाड, आशोक आवाड, माउली जाधव आदी उपस्थित होते. अभिवादन कार्यक्रम पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम वाचनालयाचे सचिव पी.एस. आवाड यांनी घेतले .

-----------------------------------

# धूळखात पडलेली भाजीमंडई वापरात आणणार

**आ. विजयसिंह पंडित : भाजी विक्रेते, व्यापारी, शेतकऱ्यांसाठी सुविधा उभारण्याचे निर्देश**



बीड : बीड शहरातील अनेक वर्षांपासून धूळ खात पडलेली सिध्दीविनायक कॉम्प्लेक्स समोरील भाजी मंडई इमारत आता वापरात आणण्यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. भाजी विक्रेते आणि नगर परिषद प्रशासनामध्ये सुरु असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर आमदार विजयसिंह पंडित यांनी स्वतः हस्तक्षेप करत संबंधित ठिकाणांची पाहणी केली आणि पालिका प्रशासनाला कडक शब्दांत सूचना दिल्या.

सोमवारी आ. पंडित यांनी नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजी मंडई, सिद्धिविनायक कॉम्प्लेक्ससमोरील भाजी मंडई इमारत तसेच जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची पाहणी केली. यावेळी भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेते आणि व्यापाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

भाजी मंडई इमारतीत स्वच्छता, वीज, पाणी आणि इतर मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून इमारत वापरात आणण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी पालिका प्रशासनाला दिले. "फक्त इमारती उभारणे नव्हे तर त्या लोकांच्या वापरात आणणे महत्त्वाचे आहे," असे सांगत शहर विकासासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजी मंडई परिसरातील ओटे आणि शेडची दुरवस्था पाहूनही त्यांनी नाराजी व्यक्त केली. भाजीपाला विक्रेते आणि फळ विक्रेत्यांनी नियोजित जागेवर बसावे, यासाठी आवश्यक सुविधा देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. दरम्यान, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राला भेट देत आ. पंडित यांनी तेथील निराधार यांच्याशी संवाद साधला. भविष्यात बेघरांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

भाजी विक्रेते, पान 3 वर

# पुरुषोत्तमपुरीत प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा प्रश्न ऐरणीवर!

**• गंगेतील होटग्याचा प्रवास जीवघेणा; चक्रतीर्थावर विनापरवाना होटग्यांची खुलेआम वाहतूक**



किट्टी आडगाव : माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरु असलेल्या अधिक मास यात्रेत भाविकांच्या जीवाशी अक्षरशः खेळ सुरु असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गोदावरी नदीतील चक्रतीर्थ परिसरात बिनपरवाना आणि कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसलेल्या होटग्यांमधून भाविकांची वाहतूक सुरु असून प्रशासन मात्र ढिम्म असल्याचे चित्र आहे. लाखो भाविकांच्या श्रद्धेच्या या यात्रेत एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा संतप्त सवाल आता भाविकांकडून उपस्थित केला जात आहे.

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी हे भारतातील अधिक मासाशी संबंधित अत्यंत महत्त्वाचे धार्मिक स्थळ मानले जाते. भगवान पुरुषोत्तमाचे अधिष्ठान असलेल्या या तीर्थक्षेत्राला दर अधिक मासात राज्यासह परराज्यातूनही लाखो भाविक पान 3 वर

# माजलगाव गुंडशाही : चाकूने हल्ला करणारा अमोल गावडे अखेर जेरबंद; मुख्य सूत्रधार सुमित कदमसह इतर आरोपी अजूनही फरार!

**दोन दिवस उलटले तरी मुख्य सूत्रधाराला पोलिसांचे 'अभय' काय?**

माजलगाव (प्रतिनिधी): माजलगाव बायपास रोडवरील हॉटेल जयवीर समोर संजय गायकवाड या तरुणावर झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणात माजलगाव शहर पोलिसांनी मोठी कारवाई करत, चाकूने सपासप वार करणारा मुख्य हल्लेखोर अमोल गावडे याला अखेर अटक केली आहे. मात्र, या संपूर्ण वादाचा मुख्य सूत्रधार सुमित बापुराव कदम आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण करणारे त्याचे इतर दोन अनोळखी साथीदार अद्यापही पोलिसांना गुंगारा देत फरार आहेत. त्यामुळे "बाकीच्या आरोपींना पोलिसांचे छुपे अभय मिळत आहे काय?" असा सवाल आता नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

**नागरिकांचा संतप्त सवाल केवळ एकाच्या अटकेने समाधान नाही; सर्व आरोपींना तात्काळ गजाआड करण्याची मागणी"**

दिनांक 22 मे रोजी सायंकाळी 6 वाजेच्या सुमारास संजय गायकवाड यांच्यावर पूर्ववैमनस्यातून आणि कौटुंबिक वादातून सुमित कदम, अमोल गावडे व त्यांच्या साथीदारांनी प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात संजय गायकवाड यांच्या हाताला गंभीर फ्रॅक्चर झाले असून ते सध्या बीड येथील जिल्हा पान 3 वर

# काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत आज कार्यक्रम



परळी :अधिक मासानिमित्त येथील श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टच्या वैद्यनाथ प्रवचन मंडप मध्ये गुरुवार दिनांक 28 मे 2026 रोजी सकाळी 9 ते 11 इष्टलिंग महापूजा त्यानंतर धर्म सभा आणि मुक्तीचा मार्ग या ग्रंथाचे विमोचन सोहळा काशी जगद्गुरु श्री. 1008 डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. धार्मिक कार्यक्रमास सर्व वीरशैव लिंगायत समाजातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त वीरशैव लिंगायत समाज, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे. परळीत कार्यक्रमाच्या तयारीसाठी सोनपेठचे श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत एक बैठक घेण्यात आली. अधिकमासानिमित्त काशी जगद्गुरुं यांच्या उपस्थितीत राज्यात ठिकठिकाणी इष्टलिंग महापूजा , धर्मसभा व ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे या अंतर्गत परळी येथे कार्यक्रमाचे 28 मे रोजी आयोजन करण्यात आले आहे .पालम .गंगाखेड येथून जगद्गुरूंचे परळी शहरात आगमन झाले आहे परळीच्या कार्यक्रमानंतर सोनपेठ येथे कार्यक्रम होणार आहे

# राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त वैजनाथ गल्ली येथे कार्यकारिणी जाहीर



परळी वैजनाथ | प्रतिनिधी लोकमाता, आदर्श राज्यकर्त्या व जनकल्याणकारी कार्यासाठी ओळख असलेल्या अहिल्याबाई होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त वैजनाथ गल्ली येथे जयंती उत्सव कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. परिसरातील युवक, ज्येष्ठ नागरिक व समाजबांधवांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात ही निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन बोले यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी आकाश गाडे यांची निवड करण्यात आली आहे. प्रसिद्धी प्रमुख लक्ष्मण बोले,संदीप बोले, रवींद्र काकडे, संतोष कुंडकर, राजेश गवते,अर्जुन बोले,गणेश होळकर ,दत्तात्रय गवते,

तसेच सल्लागार म्हणून शंकर गवते, पान 3 वर

# पावनखिंड चौकात पिण्याच्या पाण्यासाठी मागूनही ग्रामपंचायतीची नकार!

**लोकप्रतिनिधींचे नागरिकांच्या मूलभूत हक्कांकडे दुर्लक्ष!**



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे भीषण उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे स्थानिक प्रशासनाचे आद्य कर्तव्य आहे. मात्र, पावनखिंड चौकात पिण्याच्या पाण्यासाठी केवळ दोन पाण्याच्या जारची (झार) मागणी केली असता, ग्रामपंचायत प्रशासनाने ती फेटाळून लावत पाणी देण्यास नकार दिला आहे. यावरून ग्रामपंचायतीचा कारभार आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांबद्दलची अनास्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली असून, "आता यालाही राजकारण म्हणावं लागेल का?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांमधून विचारला जात आहे.पाकणी ग्रामस्थ व अजित सुरवसकर शिवबा संघटना सोलापूर जिल्हा अध्यक्ष पान 3 वर

# सुट्टीत मामाच्या गावी आलेल्या 13 वर्षांच्या बहिणीवर मामेभावाचा अत्याचार

## केज हादरले!



केज (जि. बीड): नात्याला काळीमा फासणारी आणि संपूर्ण बीड जिल्ह्याला सुन्न करून टाकणारी एक अत्यंत संतापजनक आणि संशयास्पद घटना समोर आली आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत आनंदाने मामाच्या गावी आलेल्या एका 13 वर्षीय चिमुरडीवर तिच्याच सख्ख्या चुलत मामेभावाने पाशवी अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नराधम भावाने या चिमुरडीचे हात आणि तोंड रुमालाने बांधून तिच्यावर घरातच बळजबरीने कुकर्म केले. या संतापजनक प्रकारानंतर केज पोलिसांनी तात्काळ पावले उचलत नराधम आरोपीला जेरबंद केले असून, न्यायालयाने त्याला पान 3 वर

# पहिल्याच पावसात केजचा कळंब रोड जलमय! कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर साचले घाण पाणी

**नगर पंचायत की मेगा कंपनी? जबाबदारी कोणाची?**



केज/प्रतिनिधी मान्सूनपूर्व पहिल्याच पावसाने केज शहरातील कळंब रोडवरील मुख्य रस्त्याची अक्षरशः दुरवस्था केली आहे.कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ अवघ्या एकाच पावसाने प्रशासकीय नियोजनाचे वाभाडे काढले असून, नालीचे सर्व घाण पाणी आणि चिखल थेट मुख्य रस्त्यावर आल्याने पादचारी व वाहन धारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.या परिस्थितीमुळे नालेसफाई झालीच नाही का?असा संतप्त सवाल नागरिक विचारत असून, हे अपयश नगर पंचायत चे की रस्त्याचे काम करणाऱ्या मेगा कंपनीचे, असा वाद आता रंगू लागला आहे.

कळंब रस्त्यावरुन दररोज शेकडो नागरिक, शेतकरी आणि वाहनांची मोठी वर्दळ असते.मात्र, झालेल्या पावसानंतर बाजार समितीच्या कमानी जवळ रस्त्यावर प्रचंड प्रमाणात पाणी साचले आहे.रस्त्या कडेला असलेल्या नाल्या उपसल्या न गेल्याने किंवा त्यांचा प्रवाह बंद असल्याने दूषित पाणी थेट रस्त्यावर पसरले आहे. रस्त्यावर साचलेले पाणी आणि त्यात तरंगणारा कचरा यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती निर्माण झाली आहे.

केज कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकरी आपला शेतीमाल घेऊन येत असतात.मात्र, प्रवेशद्वाराजवळच गुडघाभर पाणी आणि काळा चिखल पान 3 वर

# सौ.सावित्रीबाई आळणे यांचे दु:खद निधन



माजलगांव | प्रतिनिधी तालुक्यातील आदर्श नगर, चिंचगव्हाण येथील रहिवासी सौ. सावित्रीबाई नंदकुमार आळणे यांचे मंगळवार दि. 26 रोजी पहाटे 4 वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 70 वर्षे होते.

गेल्या दोन महिन्यांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून आळणे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पान 3 वर

# केज तालुक्यात रोज शंभर - दीडशे क्विंटल बनावट खवा तयार होतो ?

**संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरून कारवाई करावी चर्चा सत्र ?**



केज प्रतिनिधी/रोहन गलांडे केज तालुक्या रोज शंभर क्विंटल बनावट खवा तयार होतो, कोणाच्या परवानगीने होते असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे. अनेक वर्षापासून केज तालुक्यात शंभर ते दीडशे क्विंटल बनावट खावा राजरोस तयार करून त्याचे वितरण महाराष्ट्रभर होते. ही बाब केज शहरापुरती मर्यादित राहिली नसून ती संपूर्ण बीड जिल्ह्यात चालते व औषध प्रशासनाला हे कसे काय माहित नाही? तसेच बीड जिल्ह्यात राजरोस बनावट दूध विक्रीचा गोरखा धंदा तेजित आहे. मात्र, याकडेही अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष का व कशासाठी? आजपर्यंत बनावट खावा विक्रेत्यांव पान 3 वर

# कासारी ( बोडखा ) येथिल तेलखुरी शिवारात श्री भागवत आबुज यांच्यावर रानडुकराचा हल्ला



धारूर ( बाबुराव तिडके ) धारूर तालुक्यातील कासारी ( बो ) येथिल शेतमजुर श्री भागवत आबुज हे दि 25 मे वार सोमवार रोजी तेलखुरी गट नं ( 403 ) या शिवारामध्ये आपल्या पाळीव शेळ्या चारण्यासाठी गेलेल होते शेळ्या चारीत असताना सावलीच्या आडोशाला पिटुंबीच्या अवगळ्या खाली बसले असताना रानडुकर अगोदरच तेथे बसलेले असावे त्यांच्या पाठीमागून रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला त्यांना काय करावे कळेना हल्ल्यामुळे भयभित झालेले श्री भागवत अबुज सैरावैरा पळत असताना रानडुकर काही त्यांचा पाठलाग सोडत नव्हते याची चाहुल त्यांच्या बरोबर असणाऱ्या कुत्र्याला लागताच कुत्रा रानडुकरावर तुटून पडला दोघांमध्ये जवळपास दहा मिनीटे युद्ध होते शेवटी कुत्र्यापुढे रानडुकराने हार मानून पळ काढला त्यामुळे श्री भागवत आबुज वाचले तरी वनविभाग किल्ले धारूर यांनी या शेतमजुर असणाऱ्या गरीब कुटुंबाला आर्थिक मदत करावी अशी पान 3 वर

# पि एस आय श्री हनुमंत घुले यांना पितृशोक - अनेकांनी केले घुले कुटुंबाचे सांत्वन



धारुर ( बाबुराव तिडके ) धारुर तालुक्यातील गावंदरा या गावचे नामांकित घराणे श्री हनुमंत पांडुरंग घुले यांचे घराणे यांचे वडील कै पांडुरंग ( तात्या ) शंकर घुले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले ते 76 वर्षाचे होते वारकरी संप्रदायातील भजन अभंग किर्तण या मध्ये ते माहीर होते गावंदरा या गावामध्ये ( तात्या ) या नावाने परिचित होते त्यांना तीन अपत्य होते कै श्रीमंत घुले श्री हनुमंत घुले व मुलगी सौ आशाबाई असे तीन अपत्य होते या पैकी श्री हनुमंत घुले हे ग्रह विभागामध्ये परभणी शहर पोलिस स्टेशनला PSi म्हणून कार्यरत आहेत कै पांडुरंग घुले शांत संयमी मित्तभाषी व सर्वांना बरोबर घेऊन चालणारे ( तात्या ) होते त्यांच्या देवाघरी जाण्याने घुले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे अनेक राजकिय सामाजिक नामवंत व्यक्तिनी गावंदरा येथे जाऊन घुले परिवाराचे सांत्वन केले

# उमेश दळवी खून प्रकरण फास्ट्रॅक्ट कोर्टात चालवून कुटुंबाचे पुनर्वसन करा --दत्ता कांबळे

**• मुख्यमंत्री यांच्या भूमिकेबद्दल संशय : गृहविभागाला सूचना करा**




माजलगाव : (प्रतिनिधी ): दि. 24/05/2026 रोजी उमेश नवनाथ दळवी (वय 35) या असंघटित मजुराची काही व्यक्तींनी सामूहिकरीत्या निर्घृण हत्या केल्याची अत्यंत संतापजनक घटना घडली असून, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदर प्रकरणात खून व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर गुन्हे दाखल आहेत. एकाला अटक देखील करण्यात आली आहे. मात्र यात आणखीन बरेच आरोपी असण्याची दाट शक्यता आहे. या घटनेचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करीत पान 3 वर

# नित्रुड येथील सार्वजनिक वाचनालयामध्ये कर्मवीर एकनाथराव आवाड यांना स्मृतीदिनानिमित अभिवादन



माजलगाव / ( अनंत घडसिंगे ) :

बहुजनांचे झुंझार नेते मानवी हक्क अभियानचे संस्थापक अध्यक्ष कर्मवीर एकनाथराव आवाड साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त नित्रुड ता. माजलगाव जि.बीड येथील सार्वजनिक वाचनालयामध्ये अभिवादन करण्यात आले.

अठरापगड जातींसाठी लढणारे जिजा, गायरान जमिनी, ऊसतोड कामगारांसाठी लढणे, समाज घडवणे, शिक्षणाची समाजात जागृती , वाघासारखे कार्यकर्ते घडविणे, आंतरराष्ट्रीय पातळीवर दलीत समाजासाठी काम,असा त्याच्या कार्याचा उल्लेख करता येईल.यावेळी जिजांच्या आठवणींना उजाळा देत तसेच त्यांच्या कार्याचा उल्लेख करून जिजांना स्मरण करण्यात आले.

ग्रा.पं.सदस्य विष्णू आवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन पान 3 वर